# चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर
## ( निवडणूक विभाग )

ई-मेल :- com.chandrapur@gmail.com
कार्यालय दुरध्वनी क्र. ०७१७२-२५०२२०, २५५६५०

जावक क्र. चंशमनपा/निवडणूक/२०२५/ 3383
दिनांक : 19/११/२०२५

**-: जाहिर सूचना :-**
**चंद्रपूर शहर महानगरपालिका चंद्रपूर सार्वत्रिक निवडणूक २०२५**
**प्रारूप मतदार यादी प्रसिद्धी**

ज्याअर्थी चंद्रपूर शहर महानगर पालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक २०२५ करीता राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक - रानिआ /मनपा /२०२५ /प्रक्र.४१ /का-५ दि. १३/११/२०२५ अन्वये मतदार यादी तयार करणे व प्रसिद्ध करणे बाबत कार्यक्रम निश्चित करण्यात आला आहे .

त्याअर्थी चंद्रपूर शहर महानगर पालिकेच्या प्रभाग क्र. १ ते १७ मधील जनतेस याद्वारे सूचित करण्यात येते की, दिनांक ०१ जुलै २०२५ रोजी अस्तित्वात असलेल्या, ७१ - चंद्रपूर विधान सभा मतदार संघाच्या मतदार यादी वरुन, चंद्रपूर शहर महानगरपालिका प्रभाग क्र. १ ते १७ च्या निवडणुकीसाठी तयार केलेली प्रभाग निहाय प्रारुप मतदार यादी जनतेच्या माहितीसाठी व पाहण्यासाठी मनपा व मनपाच्या झोन कार्यालयात, कार्यालयीन वेळेत खालील प्रमाणे उपलब्ध करून देण्यात आली आहे.

| अ. क्र. | मनपा चंद्रपूर कार्यालय | अंतर्गत येणारे प्रभाग क्रमांक |
|---|---|---|
| १ | झोन क्र. १ | प्रभाग क्र. १, ५, ७, ८, ९ |
| २ | झोन क्र. २ | प्रभाग क्र. १०, ११, १२, १४, १५, १६ |
| ३ | झोन क्र. ३ | प्रभाग क्र. २, ३, ४, ६, १३, १७ |

मा. राज्य निवडणूक आयोगाचे आदेश व निर्देशानुसार प्रारूप मतदार यादी संदर्भात काही हरकती व सूचना असल्यास, त्या दिनांक २०/११/२०२५ ते २७/११/२०२५ पर्यंत मुख्य कार्यालय गांधी चौक,चंद्रपूर शहर महानगरपालिका,चंद्रपूर येथे कार्यालयीन वेळेत लेखी स्वरूपात पुराव्यासह दाखल करावयात. उक्त दिनांका नंतर प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचनांचा विचार केला जाणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

तसेच मतदार यादी पाहण्यासाठी निवडणूक विभाग, चंद्रपूर शहर महानगर पालिका, गांधी चौक, चंद्रपूर येथे उपलब्ध असून, ती महानगरपालिकेचे संकेतस्थळ www.cmcchandrapur.com यावर ही उपलब्ध आहे.

दिनांक :- २०/११/२०२५
ठिकाण :- चंद्रपूर.

**(डॉ.विद्या गायकवाड)**
आयुक्त
चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर.

एक प्रत ......दै. लोकमत, दै. देशोन्नती,............ यांचे कडे प्रसिध्दीसाठी पाठविण्यांत येत आहे. जाहिर सूचना कमीत - कमी ( 20 सेंमी X 12 सेंमी ) **दिनांक २०/११/२०२५** ला प्रसिध्दी करावी. जाहिर सूचना प्रसिध्दी बिलाचे भुगतान शासकिय दराने करण्यांत येईल. पालिकेचा जिएसटी क्रमांक - GSTIN:27AAALC1112H1ZS बिलात नमूद करुन बिलासोबत पेपरच्या तिन प्रति व दर प्रमाणपत्र आदेश पत्र जोडावे.

**(डॉ.विद्या गायकवाड)**
आयुक्त
चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर.